क्र. प्रतिनि/१४१९/गट-अ व ब(राज))/१३७/भाग-२/प्रशा-२/२८३
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, ८ वा मजला,
मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१
दिनांक : १५ मार्च, २०२२

विषय : संशोधन अधिकारी (वर्ग-२), वैधानिक विकास मंडळ, राज भवन सचिवालय, वाळकेश्वर रोड, मलबार हिल, मुंबई हे पद संचालनालयाच्या गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिका-याच्या प्रतिनियुक्तीने भरणेबाबत..

संदर्भ :
१. मा.राज्यपालांचे प्रधान सचिव, राज भवन सचिवालय, मुंबई यांचे नियोजन विभागास निर्देशित व संचालनालयास पृष्ठांकित पत्र क्र.राजभ/रास/आस्था-१/संशोधन अधिकारी/प्र.क्र.१८५/२०२२/५७७, दिनांक २३/२/२०२२ रोजीचे पत्र.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२, दिनांक १७/१२/२०१६
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या. १२, दिनांक १६/२/२०१८

परिपत्रक

मा.राज्यपालांचे प्रधान सचिव, राज भवन सचिवालय, मुंबई यांच्या संदर्भ क्रमांक १ समोरील दिनांक २३/२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.राज्यपालांच्या सचिव कार्यालयातील संशोधन अधिकारी (वर्ग-२), वैधानिक विकास मंडळ या एका पदावर अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी, इ. गट-ब (राजपत्रित) संवर्गातील (सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-१५, ४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीतील) अधिका-याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करावयाची असल्याबाबत कळविले आहे.

२/- तरी संचालनालयाच्या संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी, इ. गट-ब (राजपत्रित) संवर्गावरील जे अधिकारी सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्रमांक २ समोरील दिनांक १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५ व संदर्भ क्रमांक ३ समोरील दिनांक १६/२/२०१८ च्या शासन निर्णयातील सुधारित अटी व शर्ती पूर्ण करत असतील अशा सर्व अधिका-यांना विचारणा करण्यात येते की, ते मा.राज्यपालांच्या सचिव कार्यालयातील संशोधन अधिकारी (वर्ग-२), वैधानिक विकास मंडळ या प्रतिनियुक्तीच्या पदावर जाण्यास इच्छुक आहेत किंवा कसे याबाबत संचालनालयास हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ५ दिवसांच्या आत कळवावे.

(विजय आहेर)
संचालक,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुंबई.

प्रति,
श्री/श्रीमती ----------------------------
----------------------------------------
----------------------------------------

प्रत: कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग (का.१४२७), मंत्रालय, मुंबई यांना संदर्भ क्रमांक १ समोरील पत्रास अनुसरुन माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

e:\koparkar\koparkar\प्रतिनियुक्ती deputation_ltr.docx/123